# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**औरंगाबाद महानगरपालिका परिसरातील गुंठेवारी वसाहतीमध्ये बहुमजली इमारतीचे बांधकाम केल्याबाबत**

**(१) २७३ (२३-०१-२०१५). श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका परिसरातील गुंठेवारी वसाहतीमध्ये बहुमजली इमारतीचे बांधकाम झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुंठेवारी मधील घरे नियमित करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) होय.

(२), (३) व (४) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमितीकरण करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधील तरतूदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण असल्याने औरंगाबाद महापालिकेकडून अधिनियमातील तरतुदी नुसार उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## मीरा-भाईंदर महापालिकेच्या बाजार व उद्यानासाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर अतिक्रमण केल्याबाबत

**(२) ८९५ (२३-०१-२०१५). श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.संजय दत्त, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महापालिकेच्या बाजार व उद्यानासाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर अनेक विकासकांनी अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने याबाबत विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या हद्दीतील बाजार व उद्यानाकरिता आरक्षित असलेल्या भूखंडांपैकी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या क्षेत्रावर विकासकांमार्फत अतिक्रमण न झाल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूगर्भातील हालचालीमुळे भविष्यात मुंबईला भूकंपाचे मोठे धक्के बसतील असा इशारा जेष्ठ भूगर्भ शास्त्रज्ञांनी दिल्याबाबत

**(३) ४९९६ (१०-०४-२०१५). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूगर्भातील हालचालीमुळे भविष्यात मुंबईला भूकंपाचे मोठे धक्के बसतील असा इशारा जेष्ठ भूगर्भ शास्त्रज्ञांनी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूकंपाचे धक्के ६.२ ते ६.५ इतक्या रिश्टर स्केलचे असतील, त्यामुळे २३ मजल्यावरील उंच इमारतींना धोका पोहचू शकतो असा निष्कर्षही भूगर्भ शास्त्रज्ञांनी नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील २३ मजल्यांपेक्षा जास्त उंच इमारतीसंदर्भात शासनाचे धोरण काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) व (२) मुंबई विद्यापीठामध्ये जानेवारी, २०१५ मध्ये भरलेल्या इंडियन सायन्स कॉंग्रेसच्या १०२ व्या अधिवेशनामध्ये मुंबई आय.आय.टी.चे निवृत्त शास्त्रज्ञ श्री.व्ही. सुब्रमण्यम यांनी मुंबई शहराला भुकंपाचा धोका असल्याचे मत व्यक्त केले. यात त्यांनी ६.२ ते ६.५ रिश्टर स्केल इतक्या तीव्रतेच्या भूकंपाची शक्यता व्यक्त केली असून त्यामुळे उंच इमारतींना धोका असल्याचे मत व्यक्त केले आहे.

(३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. १११५०/२०१३ मध्ये दिनांक १७/१२/२०१३ रोजी आदेश देवून मुंबईतील उंच इमारतीच्या प्रस्तावाची छाननी करणेसाठी श्री.पी.एस.पाटणकर, निवृत्त न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत केलेली आहे. सदर समिती दिनांक ९/६/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यरत झालेली आहे. त्यामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विभाग, आय.आय.टी., मुंबई येथील प्राध्यापक तसेच व्हिजेटीआय, मुंबई येथील संरचनात्मक अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक निरी या संस्थेचे शास्त्रज्ञ, श्री.पंकज जोशी, वास्तुविशारद या तज्ञ व्यक्तींचा समावेश आहे.

सदर समितीकडून प्रामुख्याने ७० मी. पेक्षा जास्त उंच असलेल्या इमारतींच्या प्रस्तावाची छाननी करणेत येत आहे.

उत्तुंग इमारतीची संरचना संकल्पचित्रे ही BIS (IS:१८९३ (Part-१)२००२) च्या भुकंपरोधक तरतूदीनुसार (Sesmic Zone -III) तपासली जातात त्यामुळे भविष्यात हया इमारती मुंबईतील भूकंपाचे धक्के सहन करु शकतील.

---

### मुंबई शहरात सुरक्षिततेच्या दृष्टीने उभारण्यात आलेल्या पोलीस चौकीबाबत

**(४) ६८२९ (०६-०८-२०१५). ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात वाढत्या नागरिकरणामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरात ठिकठिकाणी पोलीस बिट बांधण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील पोलीस बिट पैकी किती बिटचा सध्या पोलीस दलाकडून वापर केला जात आहे व किती बिट बंद स्थितीत आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास. चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने ज्या बिट बंद स्थितीत आहेत त्या बिटबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) मुंबईतील सर्व पोलीस ठाणे अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखणेकामी तसेच सुरक्षेच्या दृष्टीने अधिकृत १७६ पोलीस बिट चौक्या आहेत. त्याव्यतिरिक्त कार्यरत असलेल्या पोलीस बिट चौक्यापैकी १६ पोलीस बिट चौक्या मनुष्यबळ अभावी नादुरस्त झाल्यामुळे आणि मूलभूत सोयी अभावी बंद आहेत.

---

**रत्नागिरी नगर वाचनालयाला मदुतवाढ देण्याचा प्रस्ताव रत्नागिरी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने अमान्य केल्याबाबत**

**(५) ७८२९ (०६-०८-२०१५). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुमारे १८७ वर्षाची ऐतिहासिक परंपरा जपणा-या रत्नागिरी नगर वाचनालयाला मदुतवाढ देण्याचा प्रस्ताव रत्नागिरी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान अमान्य केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर वाचनालयाला मुदतवाढ न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नगर वाचनालयाची मुदतवाढ अमान्य केल्यामुळे शहराच्या साहित्यिक सांस्कृतिक वर्तुळाला धक्का बसला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :** (१) व (२) याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नॅक कमिटी समितीमार्फत मुल्यांकन न झालेल्या विनाअनुदानित कला, विज्ञान व वाणिज्य महाविदयालयांची मान्यता काढणेबाबत**

**(६) ८११५ (०४-०८-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश विनाअनुदानित कला, विज्ञान व वाणिज्य महाविदयालयांनी नॅक कमिटी समितीमार्फत मुल्यांकन करुन घेतलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुल्यांकन न झालेल्या विनाअनुदानित महाविद्यालयांकडून निकृष्ट दर्जाचे व चुकीचे शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या ज्या विनाअनुदानित महाविद्यालयांनी नॅकद्वारे मुल्यांकन करुन घेतलेले नाही, अशा महाविद्यालयांची मान्यता, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचेदृष्टीने आणि शैक्षणिक गुणवत्ता उच्चतम रहावी, या अनुषंगाने काढून घेणे आवश्यक असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाने धोरण काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-०७-२०१६) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील आरटीई प्रवेशाच्या जागा रिक्त असल्याबाबत**

**(७) ११०६७ (२२-१२-२०१५). श्री.नागो गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात प्राथमिक शाळांमध्ये आरटीई प्रवेशाकरिता सन २०१५-१६ मध्ये एकूण किती अर्ज प्राप्त झाले व त्यापैकी आरटीई अंतर्गत किती मुलांना प्राथमिक शाळेत प्रवेश देण्यात आला,
(२) तसेच नागपूर शहरातील किती शाळांनी आरटीई अंतर्गत प्राथमिक प्रवेश देण्यात यावे,
(३) असल्यास, आरटीई अंतर्गत ज्या शाळांना प्रवेश दिले नाहीत त्या शाळांची नावे काय आहेत,
(४) असल्यास, ज्या शाळांनी आरटीई अंतर्गत प्रवेश दिले नाहीत त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०७-२०१६) :** (१) नागपूर शहरात प्राथमिक शाळांमध्ये आरटीई प्रवेशासाठी सन २०१५-१६ मध्ये एकूण ८५२१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १६०८ बालकांना प्रवेश देण्यात आला आहे.
(२) नागपूर शहरातील १६० शाळांनी आरटीई अंतर्गत प्रवेश दिले आहेत.
(३) आरटीई अंतर्गत ११७ शाळांनी प्रवेश दिलेले नाहीत.
(४) व (५) दोन्ही प्रवेश स्तरावर प्रवेश न दिलेल्या ३ शाळांविरुध्द न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे.

---

**राज्यातील सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमांवरील निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(८) ११७३८ (२२-१२-२०१५). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांसाठी सुमारे १०० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी जाहिर केल्यानंतर राज्याच्या एकूण अंदाजपत्रकीय तरतूदीपैकी किती टक्के रक्कम गेल्या ५ वर्षात राज्यातील सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांवर खर्च करण्यात आली अशी विचारणा माहिती अधिकार क्षेत्रातील कार्यकर्ते अभय कोल्हारकर यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे माहितीच्या अधिकारात केली असता सन २०१४-१५ या वर्षात ३ कोटी ३१ लाख २६ हजार रुपये इतकी रक्कम सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमांवर खर्च न झाल्याने पुन्हा शासन जमा करावी लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) सन २०१४-१५ या वर्षाची प्रत्यक्ष तरतूद पाहता सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमावरील वार्षिक खर्च प्रती व्यक्ती साडेतीन रुपयांवर गेलेला नाही, ध्वनीमुद्रित संग्रहालयासाठी एकही पैसा खर्च करण्यात आलेला नाही, राज्य सिंधी अकादमीला तरतूद असूनही अनुदान देण्यात आलेले नाही, तर राज्य गुजराती साहित्य अकादमीला याच वर्षात रुपये २१ लाख देण्यात आले इतकेच नव्हे तर राज्यातील कला आणि सांस्कृतिक संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या खर्चातही सन २०१४-१५ मध्ये गेल्या ५ वर्षाच्या तुलनेत मोठी कपात करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांवर ४९ कोटी ५७ लाख १४ हजार इतकाच खर्च झाला असून यातील ३६ कोटी हे केवळ वृध्द कलावंताना मानधन देण्यावर खर्च झालेला आहे व अन्य २० उपक्रम व कार्यक्रमांवर झालेला खर्च १६ कोटी ६८ लाख १६ हजार असल्याने माहितीच्या अधिकारात कळविण्यात आलेले असतानाही मा.सांस्कृतिक मंत्र्यांनी जाहिर केल्याप्रमाणे १०० कोटीच्या अंदाजपत्रकातील अन्य रक्कम कोणत्या उपक्रम व कार्यक्रमावर खर्च करण्यात आली आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. ध्वनीमुद्रित संग्रहालयाकरिता आवश्यक साहित्याची खरेदी न केल्याने तसेच सिंधी साहित्य अकादमीची समिती अस्तित्वात नसल्याने सदर अकादमीवर खर्च न झाल्याने तसेच कला व सांस्कृतिक संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत बऱ्याच संस्थांचे अर्ज अपात्र ठरल्याने त्या खर्चात बचत झाली आहे.

(३) या विभागाच्या अधिनस्त सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्याशिवाय ६ क्षेत्रिय कार्यालये असून त्यांच्याशी संबंधित योजनांवर खर्च झालेला आहे.

---

### कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातून वाहणाऱ्या वालधुनी आणि उल्हासनदीतील प्रदुषणाबाबत

**(९) ११७५७ (२३-१२-२०१५). श्री. जगन्नाथ शिंदे, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील वालधुनी आणि उल्हास नदयाचे प्रदुषण रोखण्यासाठी तसेच वेगवेगळ्या महापालिका आणि पालिकांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या प्रश्नांवरील तोडग्यासाठी आराखडा तयार करण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास नगरविकास विभागाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमावी व या समितीने १५ ऑक्टोबर, २०१५ अखेरपर्यंत आपला अहवाल द्यावा, असे स्पष्ट आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मोहित शहा व न्या.ए.के.मेनन यांच्या खंडपीठाने दिलेल्या आदेशाप्रमाणे शासनाने आपला अहवाल तयार केला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. रामदास कदम (२८-०६-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ अन्वये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून या समितीने वेळोवेळी बैठका देखील घेतल्या आहेत.

समितीने सुचविलेल्या उपाययोजनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेला अहवाल न्यायालयात शपथपत्राद्वारे सादर केला आहे.

(३) समितीने उल्हास व वालधुनी नद्यांचे प्रदूषण रोखण्याबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट्र असोसिएशन यांनी करावयाच्या उपाययोजनांचा कालबध्द कार्यक्रमाचा समावेश इतर अहवालामध्ये करण्यात आला आहे.

---

**सोलापूर शहरातील निवासी इमारतींना महापालिकेंच्या बांधकाम परवाना विभागाने अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेताच रहिवाशांना निवासी वापर परवाने दिल्याबाबत**

**(१०) १२३२९ (२३-१२-२०१५). श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील निवासी इमारतींना महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागाने अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेताच निवासी वापर परवाने रहिवाशांना देण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेणारी किती निवासी इमारती आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

अग्निशामक विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच निवासी वापर परवाने दिलेले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याबाबत**

**(११) १४७५२ (२९-०४-२०१६). आर्कि.अनंत गाडगीळ, श्री. संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोरगरीब जनतेने लाखो रुपये गुंतवून घेतलेली घरे अनधिकृत असल्याचे निदर्शनास आल्यावरुन या इमारती तोडण्याच्या नोटीसा देण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील अनधिकृत इमारतींना अधिकृत करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, पुणे व इतर शहरातील अशा इमारतींबाबत शासनाची भूमिका काय आहे, यापुढील काळात अशाप्रकारे अनधिकृत इमारती बांधल्या जाऊ नये यासाठी कोणती दक्षता घेण्यात येणार आहे,
(४) तसेच, यापूर्वी बांधलेल्या अनधिकृत इमारतीतील नागरिक बेघर होऊ नये यासाठी शासनाने कोणते धोरण आखले आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :** (१) ते (४) नागरी क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमित करणे, त्यावर कारवाई करणे यावर उपाययोजना सुचविण्यासाठी आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे. सदर अहवाल शासनाने स्विकारला असून त्याआधारे अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करणे, अनधिकृत बांधकामे होऊ नये यासाठी प्रशासकीय तसेच कायद्यामध्ये सुधारणा प्रस्तावित करणे, झालेली अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्यासाठी धोरण ठरविणे इ.साठीचे शासनाने धोरण ठरवून या धोरणास दि.१० मार्च, २०१६ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झालेली आहे.

अनधिकृत बांधकामासंबंधी विविध जनहीत याचिका मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या असल्याने नवी मुंबई (दिघा गाव) येथील दाखल झालेल्या जनहीत याचिकांमधील अंतरिम निर्णयानुसार शासनाचे मा.मंत्रीमंडळाने मान्य केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाची अनुमती अपेक्षिलेली होती. तथापि, मा.उच्च न्यायालयाने दि.२६/०४/२०१६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्यास अनुमती दिलेली नाही. त्यामुळे सध्या याविषयी कोणतेही आदेश/शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले नाहीत. शासन स्तरावर वैधानिक बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**परभणी जिल्हयात महसूल आयुक्तालय स्थापन करण्याबाबत**

**(१२) १५०४९ (२७-०४-२०१६). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयात नविन महसूल आयुक्तालय स्थापन करण्यासाठी नेमण्यात आलेल्या एक सदस्यीय अभ्यास गटाने आपला अहवाल शासनाकडे सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील अहवालाप्रमाणे महसूल आयुक्तालय स्थापन करण्याबाबतची कोणती अंतिम कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, जनतेच्या मागणी प्रमाणे परभणी जिल्हयात महसूल आयुक्तालयाचे मुख्यालय स्थापन करण्यात आले आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :** (१), (२) व (३) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद चे विभाजन करून नव्याने निर्माण करावयाच्या विभागीय आयुक्तालयात कोणत्या जिल्हयांचा समावेश करावा व नवीन विभागीय आयुक्तालयाचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी असावे या विषयी

सखोल अभ्यास करून तत्संबंधी शासनास शिफारशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या एक सदस्यीय अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालाची तपासणी केली असता सदर अभ्यास गटाने त्यास संदर्भीत केलेल्या मुद्यांसंदर्भात निश्चित अशी शिफारस केलेली नव्हती. यासाठी सदर अभ्यास गटास फेर अभ्यास करून सुस्पष्ट शिफारशीसह अहवाल सादर करण्याबाबत शासन पत्र दिनांक १६ मे, २०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एमसीव्हीसीच्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत**

**(१३) १५१३४ (०१-०६-२०१६). श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमसीव्हीसीच्या विद्यार्थ्यांना असलेल्या पुढील करिअरच्या मर्यादित संधी, भाषा विषयांचा अभाव, पुरातन अभ्यासक्रम आणि उच्च तंत्र शिक्षणातील प्रवेश बंदी हे चित्र बदलण्याबाबत वारंवार होणा-या मागणीची दखल शासनाने घेतली आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६) :** (१) होय,

(२) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय दिनांक ०४.०७.२०१५ अन्वये उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (एमसीव्हीसी) राबविणाऱ्या शासकिय, अशासकीय अनुदानित व अशासकीय विना अनुदानित संस्थांमध्ये जुने अभ्यासक्रम रुपातंरीत करुन नवीन अभ्यासक्रम सन २०१५-१६ पासून नवीन पाठयक्रमाप्रमाणे राबविण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नविन तहसिल कार्यालयांची निर्मिती करण्याबाबत**

**(१४) १५१५२ (२७-०४-२०१६). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नविन तहसिल कार्यालयांची निर्मिती करण्यासाठी सर्व विभागीय आयुक्तांची समिती गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर करुनही अदयापी त्यावर अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालावर अंमलबजावणी करुन बोरगांव मंजू येथे स्वतंत्र तहसिलदारांची नियुक्ती करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१), (२) व (३) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली इतर सर्व विभागीय आयुक्त सदस्य असलेली समिती शासन निर्णय क्र. प्राफेब-२०११/प्र.क.९६/म-१०, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ अन्वये गठीत करण्यात आली होती. समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला असून अहवालातील शिफारशीवर सविस्तर सर्व विभागीय आयुक्ताचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. सर्व विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका विभाजनाचे निकष निश्चित करून बोरगाव मंजू तालुका तसेच नवीन तालुका निर्मितीबाबत प्रकरणपरत्वे गुणवत्तेनुसार उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठातील कर्मचा-यांच्या विविध प्रलंबित असलेल्या मागण्या**

**(१५) १५५३१ (२९-०४-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील ६० हून अधिक अधिका-यांना मागील तीन वर्षापासून पदोन्नती देण्यात आलेली नसल्याचे तसेच ८८ निवृत्त कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीचा प्रश्न प्रलंबित असल्याचे व ३३ जणांना मागील २ वर्षापासून सेवानिवृत्ती वेतन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मुंबई विद्यापीठातील कर्मचा-यांनी आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रेडीरेकनरची दरवाढ रोखण्याबाबत**

**(१६) १५५३४ (२७-०४-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रेडीरेकनरचे दर दरवर्षी १ जानेवारी पासून निश्चित करण्यात येतात, यावेळेस दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून हे दर निश्चित होतील असे शासनाने जाहिर केले आहे, हे खरे

आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक मंदीचा विचार करता दरवाढ करण्यात येऊ नये अशी जनतेकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रेडीरेकनरचे भाव वाढवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सन २०१६-१७ साठी, वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दरामध्ये राज्यात माफक दरात वाढ करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षण धोरण शिक्षण विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केल्याबाबत**

**(१७) १५५६५ (२९-०४-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण धोरण शिक्षण विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केले असताना मा. मुख्यमंत्री यांच्या हस्तक्षेपानंतर मागे घेण्यात आले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शिक्षण क्षेत्रातील आरक्षणाबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) तसेच, पूर्वी वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या चुकीच्या शिक्षण आरक्षणाबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१६) :** (१) होय.

(२) नवीन शैक्षणिक धोरणाबाबत जनतेकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायावरील ते मसुदा धोरण होते.

(३) शिक्षण क्षेत्रातील प्रचलित आरक्षणाच्या धोरणात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विद्यापीठांच्या विकेंद्रकरणासाठी करावयाची कार्यवाही**

**(१८) १७०३० (२९-०४-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांच्या विकेंद्रकरणासाठी उपकेंद्रा विषयी शासनास शिफारशी करण्याकरिता शासनाने समिती नेमलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीची रचना, कार्यकक्षा व कालावधी काय आहे,
(३) उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व साधारणत: अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०७-०६-२०१६) :** (१) होय. राज्यातील विद्यापीठांच्या विकेंद्रीकरणाकरता डॉ.राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक २३.१०.२०१० अन्वये एक समिती गठित करण्यात आली होती.
(२) सदर समितीची रचना कार्यकक्षा व कालावधी सोबतच्या पुरक टिप्पणीत नमूद करण्यात आली आहे.
(३) डॉ. ताकवले समितीने ५ ऑगस्ट, २०११ रोजी त्यांचा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये उपकेंद्रांकरता निश्चित करायची पदे तसेच उपकेंद्राकरता येणारा एकूण खर्च या बाबी अधिक स्पष्ट करण्याकरता डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि.२८.०४.२०१५ अन्वये एका समितीची स्थापना करण्यात आली आहे. डॉ.काळे समितीने त्यांचा अहवाल शासनास दि.२३.०२.२०१६ रोजी सादर केला असून सदर शिफारशींना मान्यता घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील महापालिका, नगरपालिका व ग्रामीण भागातील आरक्षित जमिनीची संपादन मुदत दोन वर्षापर्यंत वाढविण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(१९) १७०९८ (१८-०७-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महापालिका, नगरपालिका व ग्रामीण भागातील आरक्षित जमीन दहा वर्षांच्या काळात संपादित करणे शासकीय यंत्रणांना शक्य न झाल्यास त्या जमिनीवरील आरक्षण रद्द करण्याची संस्थाची एक वर्षाची मुदत दोन वर्षापर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाचा अध्यादेश जारी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१६) :** (१) व (२) नियोजन प्राधिकरणांच्या मंजूर विकास योजनांमधील आरक्षणे १० वर्षात ताब्यात घेण्याची कार्यवाही/नगरपालिका/महानगरपालिकांनी केली नसल्यास जमीन मालकांस कलम १२७ नुसार खरेदी सुचना दिल्यानंतर १ वर्षात कलम १२६ सह कलम ६ ची भुसंपादनाची सुचना निर्गमित करणे आवश्यक आहे. सदर एक वर्षाचा कालावधी दोन वर्षाचा करण्याबाबत अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली असून महाराष्ट्र अधिनियम क्र.१७/२०१५ रोजीच्या शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे.
(३) आवश्यकता नाही.

---

**राज्यातील महानगरपालिकांच्या हद्दीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या भूसंपादनावर विकास हक्क हस्तांतरण वाढविण्याबाबतचा**

**(२०) १७१३० (०४-०६-२०१६). श्री. शरद रणपिसे, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिकांच्या हद्दीत शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या भूसंपादनावर विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) वाढविण्याबाबतचा निर्णय माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आलेला असून सदर निर्णय राज्यातील १८ महानगरपालिकांमध्ये लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याचा कशा प्रकारे लाभ होणे अपेक्षित आहे,

(३) सध्या कोणत्या महानगरपालिकांमध्ये सदर निर्णयाचा लाभ देण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे,

(४) उर्वरित महानगरपालिकांमध्ये उक्त निर्णयाचा लाभ न देण्याची कारणे काय आहेत व याबाबत कोणती कार्यवाही सुरु आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१), (२), (३) व (४) होय, राज्यातील मंजूर विकास योजनांमधील आरक्षित जागा महानगरपालिकांना मिळण्यासाठी त्या जागेचा भुसंपादन मोबदला म्हणून आरक्षित क्षेत्राच्या दुप्पट टिडीआर देणेकरीता शासनाने अधिसूचना दि. २८/०१/२०१६ रोजी निर्गमित केली आहे. ही अधिसूचना कोकण विभागातील महानगरपालिका सोडून उर्वरीत सर्व महानगरपालिकांना लागू केली आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सोडून कोकण विभागातील इतर सर्व महानगरपालिकांना दि. २९/०१/२०१६ च्या शासन निर्णयानुसार लागू केला आहे.

या शासन निर्णयामुळे विकास आराखड्यामध्ये प्रस्तावीत असलेल्या आरक्षित जागा सार्वजनिक प्रयोजनार्थ महानगरपालिकांच्या ताब्यात येण्यास मदत होईल.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत**

**(२१) १७३२७ (२७-०४-२०१६). श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन विभागात नव्याने तयार होणाऱ्या २०१६-२०२० च्या वेतन करारात एसटी कर्मचाऱ्यांना २८ टक्के पगारवाढ देण्यासह भत्त्यांमध्येही २३ टक्के वाढ तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा व मूळ विभागात बदली या मागण्यांसाठी एस.टी. कर्मचाऱ्यांच्या संघटनेने माहे एप्रिल, २०१६ मध्ये मोर्चा काढण्याचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :** (१) होय.

(२) प्रशासनास योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औषध खरेदी करण्याची सक्ती नसल्याचे फलक न लावणाऱ्या पुणे शहरातील खाजगी रुग्णालयांवर कारवाई करणेबाबत**

**(२२) १७३३४ (२८-०४-२०१६). श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांचा गैरफायदा घेवून त्यांना आपल्याच रुग्णालयातील मेडीकल स्टोअर मधून औषधांची खरेदी करण्यास सक्ती नसल्याचे फलक लावण्याची नोटीस महापालिकेच्या आरोग्य खात्याने बजावली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारचे फलक न लावणाऱ्या रुग्णालयांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :** (१) अन्न व औषध प्रशासनाच्या निर्देशानुसार, पुणे शहरातील खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना लागणारी औषधे त्याच रुग्णालयाच्या मेडिकल स्टोअर मधून खरेदी करण्याची सक्ती नाही, या आशयाचे फलक लावण्याच्या सूचना खाजगी रुग्णालयांना पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यामार्फत दिनांक ९.१०.२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

(२) पुणे शहरातील खाजगी रुग्णालयांमध्ये संबंधित आशयाचे फलक रुग्णालय प्रशासनाने लावले नसल्याचे आढळून आल्यास, अशा रुग्णालयांची नांवे पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता अन्न व औषध प्रशासन विभागास पुणे महानगरपालिकेमार्फत कळविण्याची तजविज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भातील ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करण्याबाबत**

**(२३) १७८५३ (२९-०४-२०१६). श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात अनेक ऐतिहासिक स्थळे असून त्या वास्तूंची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हेरिटेज वास्तूचे संवर्धन होण्याची नितांत गरज असल्याने त्यासाठी प्रयत्न अपुरे पडत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील ऐतिहासिक स्थळांबाबत प्रसिध्दी पाहिजे त्या प्रमाणात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भातील ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० मधील तरतूदीस अनुसरुन राज्यातील प्राचीन, ऐतिहासिक, सांस्कृतिक व पुरातत्वीय दृष्ट्या महत्वाच्या गड, किल्ले, मंदिरे, वास्तू इत्यादींना राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात येतात. सदर कार्यवाही निरंतर करण्यात येत असते. त्यानुसार विदर्भात एकूण ८० राज्य संरक्षित स्मारक असून त्यांच्या जतन व दुरुस्तीची कार्यवाही पुरातत्व विभागामार्फत आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) वर नमूद केल्याप्रमाणे एकूण ८० राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व दुरुस्तीची कार्यवाही आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विद्यापीठाला विविध शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक कामासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागत असल्याबाबत**

**(२४) १७८६० (२९-०४-२०१६). श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठाच्या प्रस्तावित कायद्यातील तरतुदींनुसार विद्यापीठाला विविध शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक बाबींसाठी शासनाची परवानगी घ्यावी लागणार असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०७-२०१६) :** (१) याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक, २०१६ चे क्र. १६ हे विधेयक विधीमंडळात सादर केले असून ते २१ सदस्यीय संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले आहे. सदरहू समितीने ६ महिन्यात अहवाल सादर करावा असे विधानमंडळाने ठरविले आहे. सदर विधेयक विधानमंडळाने मंजूर केल्यानंतरच कार्यवाही करणे शक्य होणार आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात पिण्याच्या पाण्याचा होत असलेला अपव्यय रोखण्याबाबत**

**(२५) १८०१६ (२९-०४-२०१६). श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात पिण्याच्या पाण्याचा वापर बांधकामांकरिता, उद्यानांत तसेच वॉशिंग सेंटरमध्ये होत असून पाण्याचा अपव्यय होत असल्याबाबतच्या महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे होत असलेल्या तक्रारीवरुन निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीच्या अनुषंगाने काय निदर्शनास आले तद्नुसार पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) सदर प्रकरणी रस्त्यावर पाण्याचा सडा टाकणे, गाडया धुणे, पाण्याच्या टाक्या ओव्हर फ्लो होणे, बगीचासाठी पाण्याचा वापर करणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्यानंतर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येते. त्यानुसार माहे सप्टेंबर, २०१५ ते मे, २०१६ अखेर ११०४ जणांवर केलेल्या कार्यवाहीत दंड स्वरुपात रुपये ८,२०,९५०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच पुणे महानगरपालिकेच्या तक्रार निवारण कक्षाकडे प्राप्त तक्रारी व महानगरपालिकेकडे लेखी व तोंडी तक्रारींची दखल घेऊन संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात येते.

पिण्याचे पाणी बांधकाम, वॉशिंग सेंटर, पोहण्याचे तलाव यासाठी वापरण्यात आल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर नळजोड बंद करण्यात आले असून, या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

पाण्याचे महत्व लक्षात घेऊन पाणी बचतीसाठी महानगरपालिकेने स्थानिक वृत्तपत्राद्वारे व .सार्वजनिक ठिकाणी फलक लावून पाणी बचतीसाठी आव्हान करण्यात आले आहे. तसेच ज्या तरण तलावाकरिता पिण्याचे पाणी वापरण्यात येत होते असे जलतरण तलाव बंद करण्याबाबतची कारवाई करण्यात आली.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्वतंत्र फिल्म ॲण्ड टेलीव्हीजन विद्यापीठ उभारण्याचा निर्णय घेण्याबाबत

**(२६) १८२२३ (२९-०४-२०१६). श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात चित्रपट निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र फिल्म ॲन्ड टेलीव्हीजन विद्यापीठ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चित्रपट निर्मितीसाठी लागणाऱ्या परवानग्यांची संख्या कमी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील चित्रपट निर्मात्यांना चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन मिळणार आहे, हे खरे आहे काय ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे. चित्रपट विद्यापीठ उभारण्याचा निर्णय महामंडळाच्या संचालक मंडळाने घेतला आहे.
(२) चित्रपट निर्मितीसाठी लागणाऱ्या परवानग्यांची संख्या कमी करण्यात आलेली नाही. तथापि, शासनाच्या विविध विभागांकडून आवश्यक असणाऱ्या परवानग्या एकाच ठिकाणी प्राप्त व्हाव्यात या उद्देशाने एक खिडकी योजनेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) हे खरे आहे.

---

**नागपूर येथील राजभवन परिसरात साठलेला कचरा हटविणेबाबत**

**(२७) १८३०६ (२९-०४-२०१६). श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राजभवनच्या परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साठल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी करून राजभवन परिसरातील कचरा हटविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक ०६/०२/२०१६ च्या दैनिकात वृत्त प्रसिध्द होताच, महानगरपालिकने सदरचा कचरा त्वरीत हटविलेला आहे.

तसेच राजभवनाच्या कुंपन भिंतीवरुन बाहेरचे लोक कचरा टाकतात हे लक्षात आल्याने, लगतच्या १७ रहिवाशांना नोटीस देऊन, कचरा टाकू नये असे कळविण्यात आले आहे. सध्या तेथे कचरा दिसून येत नाही अथवा तशी तक्रारही प्राप्त झालेली नाही.
(३) विलंब झालेला नाही.

---

**ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टा व कोकण भवन येथे बसफेऱ्यात वाढ करण्याबाबत**

**(२८) १८४८२ (२९-०४-२०१६). श्री. संजय दत्त, श्री. हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टा व कोकण भवन येथील शासकीय कार्यालयात येणाऱ्या डोंबिवली आणि बदलापूरकरांसाठी एमएमएमटी व्यवस्थापनाने कल्याण, डोंबिवली, आणि बदलापूर शहरासाठी वेगवेगळ्या मार्गावर बसफेऱ्या सुरु केल्या, परंतु सदरील बससेवा तोट्यात सुरु असल्याने ५० टक्के बस फेऱ्यात कपात करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपुऱ्या बस फेऱ्यांमुळे प्रवाशांची गर्दी वाढत असल्याने याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सद्यस्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकडून कल्याण, डोंबिवली आणि बदलापूर शहरांसाठी एकूण ६ बस मार्गावर ४० बसेसच्या १८७ फेऱ्यांद्वारे दैनंदिन बससेवा देण्यात येत आहे. या मार्गावर सुरु असलेल्या बस सेवेमुळे महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमास तोटा होत असला तरी बसेस किंवा बस फेऱ्यांमध्ये कपात करण्यात आलेली नाही.

(२) कल्याण, डोंबिवली व बदलापूर विभागात नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकडून देण्यात येणाऱ्या बससेवेवर परिवहन उपक्रमास सरासरी प्रति किलोमीटर रुपये २५ ते २७ एवढा तोटा सहन करून बससेवा देण्यात येत आहे.

कल्याण, डोंबिवली आणि बदलापूर विभागात वेगवेगळ्या मार्गांवर बससेवा चालू ठेवत असताना, नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमास तोटा सहन करावा लागत असला तरी या मार्गावर चालविण्यात येणाऱ्या बसेस तसेच बसफेऱ्यांमध्ये कपात करण्यात आलेली नाही.

प्रवाशांच्या मागणीनुसार वाशी ते डोंबिवली या बस मार्गावर २ अतिरिक्त बस फेऱ्या, तर वाशी ते कल्याण मार्गावर ३ अतिरिक्त बस फेऱ्या माहे जून, २०१६ पासून सुरु करण्यात येणार असल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय-निमशासकीय रुग्णालयांमधून रुग्णसंख्येच्या प्रमाणात फार्मासिस्टची नियुक्ती करण्याबाबत**

**(२९) १८५४७ (२९-०४-२०१६). श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय-निमशासकीय रुग्णालयांमधून रुग्णसंख्येच्या प्रमाणात फार्मासिस्टची नियुक्ती करण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तांनी दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करण्याबाबत शासनास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये थेट निवडणूकांमधून स्टुडण्ट कौन्सिल आणि जनरल सेक्रेटरी निवडण्याबाबत**

**(३०) १८५८८ (२९-०४-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक पाचवी मधील प्रश्न क्र.९३५४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये थेट निवडणूकांमधून स्टुडण्ट कौन्सिल आणि जनरल सेक्रेटरी निवडण्यासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने विचाराधीन असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, सदरहू कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०४-०७-२०१६) :** (१) कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक, २०१६ चे क्र.१६ हे विधेयक विधीमंडळात सादर केले असून ते २१ सदस्यीय संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले आहे. सदरहू समितीने ६ महिन्यात अहवाल सादर करावा असे विधानमंडळाने ठरविले आहे. सदर विधेयक विधानमंडळाने मंजूर केल्यानंतरच महाविद्यालये आणि विद्यापीठामध्ये थेट निवडणूका इत्यादी बाबतची कार्यवाही करणे शक्य होणार आहे.

---

**राज्यात नवीन महाविद्यालये सुरु करण्याबाबत**

**(३१) १८५९० (२९-०४-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांकः ११६७१ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८२ (१) उच्च शिक्षणाचे समतोल व समन्यायी वाटप होण्याच्यादृष्टीने विद्यापीठांनी सर्वसमावेशक बृहत आराखडा तयार करून राज्य उच्च शिक्षण परिषदेसमोर सादर करण्याच्या सूचना सर्व अकृषी विद्यापीठांना शासन परिपत्रक दिनांक २९ एप्रिल, २०१५ अन्वये देण्यांत आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात नवीन महाविद्यालये सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने गठीत केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशीनुसार नवीन बृहत आराखडे तयार करण्याची विद्यापीठस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ व २०१५-२०१६ मध्ये फक्त २ महाविद्यालयांना मान्यता देण्यांत आल्याच्या पार्श्वभुमीवर विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी अडचणी उद्भवू नये म्हणून आता राज्यात किती नवीन महाविद्यालयांना मंजुरी देण्यांत आली वा येणार आहे,
(४) नसल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (१५-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) सदरबाबत शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.
(४) दिनांक ३१ जुलै, २०१६ पर्यंत कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**राज्यात दूध भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३२) १८५९५ (२९-०४-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२९७७ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुधात घातक पदार्थांची भेसळ करणाऱ्यांविरुध्दच्या कारवाई अंतर्गत अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २०११ चे कलम ५९ मध्ये कडक शिक्षेची तरतुद करण्याबाबत केंद्र शासनाने गठीत केलेल्या सुधारणा समितीस अन्न व औषध प्रशासनाने शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच शिक्षेचा सुधारित मसुदा तयार करण्याची केंद्र शासनाकडील गठीत समितीची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, शिक्षेचा मसुदा अंतिम झाला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासुन होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, राज्यात अद्यापी दुध भेसळीचे प्रकार निदर्शनास येत असल्याचे पार्श्वभुमीवर लहान बालके व सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याच्या हिताच्यादृष्टीने शासनाने केंद्र स्तरावर कोणता पाठपुरावा केला व करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट (३०-०६-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) अन्न सुरक्षा कायद्यातील कलम ५९ अंतर्गत कारावासाच्या शिक्षेचा कालावधी व द्रव्यदंडाची रक्कम वाढविण्याची शिफारस केलेली आहे.
(३) सदर बाब केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.
(४) दूध भेसळीवर अंकुश ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने केंद्र शासनाकडे कलम ५९ मध्ये कडक शिक्षेची तरतुद करण्याची शिफारस केली आहे.

---

### राज्यातील टीडीआरच्या नवीन धोरणाबाबत

**(३३) १८६१५ (०३-०५-२०१६). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्व महानगरपालिका तसेच नगरपालिका हद्दीमधील विकास आराखड्यातील आरक्षित जागा टी.डी.आर.च्या माध्यमातून ताब्यात घेण्याकरिता सुधारित धोरण ठरविण्यासाठी गठीत अभ्यास गटाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास,अभ्यासगटाच्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन शासनाने टी.डी.आर.संबंधीचे नवीन धोरण जाहिर करण्यासंबंधीची सूचना जनतेच्या हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत नियुक्त अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, तसेच सदर धोरण अंतिम करण्याची शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व सदरहु धोरणाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) व (४) होय. राज्यातील मंजूर विकास योजनांमधील आरक्षित जागा महानगरपालिकांना मिळण्यासाठी त्या जागेचा भुसंपादन मोबदला म्हणून आरक्षित क्षेत्राच्या दुप्पट टिडीआर देणेकरीता शासनाने अधिसूचना दि. २८/०१/२०१६ रोजी निर्गमित केली आहे. ही अधिसूचना कोकण विभागातील महानगरपालिका सोडून उर्वरीत सर्व महानगरपालिकांना लागू केली आहे.

अशाच प्रकारचा शासन निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिका सोडून कोकण विभागातील इतर सर्व महानगरपालिकांना दि. २९/०१/२०१६ च्या शासन निर्णयानुसार लागू केला आहे.

या शासन निर्णयामुळे विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित असलेल्या आरक्षित जागा सार्वजनिक प्रयोजनार्थ महानगरपालिकांच्या ताब्यात येण्यास मदत होणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सन २०१५ च्या महसुली विभाग वाटप नियमावलीमध्ये सुधारणा करण्याबाबत**

**(३४) १८६२८ (०३-०५-२०१६). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासन सेवेतील गट-अ व गट-ब पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने महसुली विभाग वाटप करताना रिक्त पदे विचारात घेऊन गुणवत्ता यादी किंवा निवडसूचीतील क्रमांकानुसार नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या विभागात चक्राकार पध्दतीने वाटप करुन रिक्त पदे भरल्यानंतर निवडसूचीतील किंवा गुणवत्ता यादीतील उर्वरित अधिकाऱ्यांना कोकण व पुणे विभाग या महसुली विभागात नियुक्ती देण्याचे आदेशित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वीच्या विभाग संवर्ग वाटप नियमावली, २०१० मध्ये नियुक्तीकरीता रिक्त पदे विचारात घेऊन गुणवत्ता यादीनुसार किंवा निवडसूचीतील क्रमांकानुसार राज्यातील सहाही महसुली विभागात महसुली विभाग वाटप करण्याची तरतूद होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शासन निर्णयानुसार व नवीन आदेशानुसार नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक या विभागातील रिक्त पदे भरल्यानंतर कोकण, पुणे या महसुली विभागातील रिक्त पदे भरण्याबाबतची तरतूद सन २०१५ मधील नियमावलीमध्ये करण्यात आल्यामुळे कोकण विभागातील अधिकाऱ्यांना पदोन्नतीच नाकारण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ व माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महसूली विभाग वाटप नियम, २०१५ च्या तरतुदीनुसार यापुढे कोकण विभागातील रिक्त पदे भरली जाणार नसल्याने रिक्त पदांमुळे कोकण विभागामध्ये नवनवीन योजना राबविण्यावर व अन्य विकासकामांवर त्याचा होणारा परिणाम लक्षात घेता, महसूली विभाग वाटप नियम, २०१५ मध्ये सुधारणा करण्यात येऊन पुर्वीच्या महसुली विभाग संवर्ग वाटप नियम, २०१० मधील तरतुदीनुसार करण्याची मागणी कोकण व पुणे विभागातील अधिकाऱ्यांनी शासनाकडे माहे मे, २०१५ पासून करीत असल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार सन २०१५ ची महसुली विभाग वाटप नियमावलीमध्ये सुधारणा करण्याचेदृष्टीने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१६) :** (१) होय, दिनांक २८.०४.२०१५ च्या अधिसूचनेद्वारे सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(२) होय.

(३) काही विभागातील अधिकाऱ्यांनी स्वत:हून पदोन्नती नाकारल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) अशा स्वरुपाची मागणी या विभागाकडे प्राप्त झाली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथील पाणी पुरवठ्याच्या नियोजनाबाबत**

**(३५) १८६६० (२९-०४-२०१६). श्री. जनार्दन चांदूरकर, श्री. संजय दत्त, श्री. रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे उन्हाळा संपताना दरवर्षी उद्‌भवणारी पाणी टंचाई लक्षात घेवून पाणी पुरवठ्याचे नियोजन बारा महिन्यांऐवजी पंधरा महिन्यांसाठी करण्याची घोषणा सन २०१३ मध्ये तत्कालीन महापालिका आयुक्त यांनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घोषणेनुसार पाणी पुरवठ्याचे नियोजन बारा महिन्यांऐवजी पंधरा महिन्यांसाठी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील विटभट्टी महासंघाच्या विविध मागण्यांबाबत**

**(३६) १९२७० (२७-०४-२०१६). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व शेतकरी विट उत्पादक चोहोट्टा बाजार व परिसर यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांना विटभट्टी सुरु करण्याबाबत निवेदन सादर केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अंमलबजावणी केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) चोहोट्टा बाजार शेतकरी वीट उत्पादक संघ यांनी मा. पालकमंत्री अकोला यांच्याकडे मातीच्या स्वामीत्वधनाची रक्कम पूर्ववत करणे व पर्यावरणविषयक अटी शिथील करण्याबाबत माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे.

(२) व (३) शासनाने कुंभार समाजातील कुटुंबांना त्यांच्या पारंपारिक व्यवसायासाठी प्रति कुटुंब दरवर्षी ५०० ब्रासपर्यंतच्या मातीवर स्वामित्वधनाची सवलती दिली आहे. मातीवरील स्वामित्वधनाच्या दरात ५ वर्षानंतर सुधारणा करण्यात आली असल्याने, सदर दर पूर्ववत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील केंद्र शासनाच्या मालकीची हिंदुस्थान ॲन्टीबॉयटीक्सच्या आर्थिक स्थितीबाबत

**(३७) २९४७९ (०३-०६-२०१२). श्री.नागो गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील हिंदुस्थान ॲन्टीबॉयटीक्स कंपनी लि. ही एकमेव केंद्र शासनाच्या मालकीची औषध उत्पादक कंपनी असून या कंपनीची आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय असल्याने कंपनीला मदत करण्याच्या दृष्टीने व कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना नियमित व वेळेवर वेतन देण्याकरिता सदर कंपनीची औषधे राज्यातील शासकीय रुग्णालयात प्रथम प्राधान्याने घेण्याबाबतचे आदेश केंद्र शासनाकडून राज्य सरकारला देण्यात आल्या असून त्या अनुषंगाने शासनाकडे मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) अद्यापपर्यंत निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०६-२०१६) :** (१) व (२) हिंदुस्थान अँटीबायोटिक्स लि. यांनी त्यांच्या स्वत:च्या जागेत उत्पादीत केलेली औषधे निविदा पध्दतीने खरेदी न करता थेट विकत घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर निर्णयास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे विद्यापीठाच्या वसतिगृहात पाण्याचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(३८) ३०७९४ (०४-०८-२०१२). श्री. अनिल भोसले, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. हेमंत टकले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विद्यापीठाच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना माहे एप्रिल, २०१२ पासून मोठ्या प्रमाणात पाण्याचा तुटवडा निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पाण्याची टंचाई भासू नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०६-२०१६) :** (१), (२) व (३) माहे एप्रिल, २०१२ मध्ये पूर्ण महानगरपालिकेकडून काही वेळा पाणीपुरवठा न झाल्यामुळे पाणी टंचाई भासत होती, तथापि, आता पाणीपुरवठा सुरळीत आहे.

---

**पुणे-पिंपरी चिंचवड आणि जिल्ह्यात ३३ टक्के फ्लॅट एलआयसी किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राखून ठेवण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३९) ४००४१ (१४-०५-२०१३). श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-पिंपरी चिंचवड आणि जिल्ह्यात ३३ टक्के फ्लॅट एलआयसी किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राखून ठेवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) व (२) शासनाने, राज्यातील दहा लक्ष व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) विकास नियंत्रण नियमावली मध्ये परवडणारी घरे उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन त्याबाबतची अधिसूचना दिनांक ८/११/२०१३ अन्वये निर्गमित केलेली आहे. यास काही मुद्यांबाबत दुरुस्ती शासनाने दिनांक ०३/०९/२०१५ चे अधिसूचनेद्वारे मंजूर केली आहे. या तरतूदीनुसार ४००० किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्राच्या भुखंडावर कोणतीही गृहनिर्माण योजना किंवा रहिवास विकास प्रकल्प राबवावयाचा झाल्यास त्यामध्ये मूळ चटई क्षेत्र निर्देशांकाच्या किमान २०% क्षेत्र आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीची योजना (EWS) / अल्प उत्पन्न गटासाठीच्या योजनांसाठी (LIG) राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेने नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित रस्त्याचे क्षेत्र कमी दाखविल्याबाबत**

**(४०) ४२७२० (३०-०८-२०१३). श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री. जयंतराव जाधव, श्री. सतीश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने माहे एप्रिल-मे, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान जाहिर केलल्या अहवालात नमूद केल्यानुसार विद्यमान वापरातील रस्त्याचे क्षेत्र एकूण २२,९५० हेक्टर दाखविले असून प्रस्तावित रस्त्याचे क्षेत्र २०,१६० हेक्टर दाखविले आहे म्हणजेच रस्त्याचे भविष्यातील क्षेत्र २७९० हेक्टरने कमी झाले आहे. त्याचप्रमाणे नद्या, नाले याचे विद्यमान क्षेत्र ९,१४० हेक्टर असून प्रस्तावित वॉटर बॉडीजचे क्षेत्र ६९६० हेक्टर दाखविण्यात आले आहे, म्हणजेच भविष्यातील नद्या, नाले यांचे क्षेत्र २१८० हेक्टरने कमी होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने या गोष्टीच्या विसंगतीवर आळा घालण्यासाठी शासन काही धोरणात्मक ठोस पावले उचलणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) व (२) पुणे शहराची विकास योजना शासन नियुक्त समितीने शासनास मंजूरीकरिता सादर केली आहे. सदर विकास योजनेचा छाननी अहवाल संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्राप्त झाला आहे. शासन स्तरावर विकास

योजनेला अंतिम मंजूरी देताना छाननी समितीमार्फत याची छाननी होणार आहे. छाननीच्या वेळी विद्यमान जमीन वापर नकाशा व प्रारूप प्रस्तावित जमीन वापर नकाशा या मधील रस्त्याचे/पाण्याचे क्षेत्राचे तफावतीबाबत तपासणी करण्यात येईल. तसेच आवश्यक ती कार्यवाही विकास योजनेला मंजूरी देण्यापूर्वी करण्यात येईल.

(३) लागू नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखडयात बऱ्याच ठिकाणी पुररेषा दाखविली नसल्याबाबत

**(४१) ४२७३० (३०-०८-२०१३). श्री.अनिल भोसले, श्री.सदिप बाजोरिया, श्री. जयवंतराव जाधव, श्री. सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याच्या इतिहासात सन १९६१ साली पानशेत धरण फुटल्याच्या मोठया घटनेनंतर देखील पूर सदृश्य संभावित परिस्थितीचा गांभिर्याने विचार न करता पुणे महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखडयात बऱ्याच ठिकाणी पुररेषा दाखविलीच गेलेली नाही, नदीचे पात्र अंदाजे दाखविणे, जुने ग्रीन बेल्ट गायब होणे, असे प्रकार निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन या विषयातील तज्ञांची समिती गठीत करुन पुनर्विलोकन करणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) व (२) पुणे शहराच्या मुळ हद्दीचा विकास आराखडा शासनाकडे शासन नियुक्त समितीने मंजूरीकरीता सादर केला आहे. या प्रारुप आराखंडयामध्ये पूररेषा दर्शविण्याबाबत पूररेषा आखणीचे नकाशे जलसंपदा विभागांकडून प्राप्त करुन सादर करण्यास महानगरपालिकेस कळविले आहे. शासन स्तरावर विकास योजनेला मंजुरी देताना पुररेषा दर्शविण्याबाबत आवश्यक ती वैधानिक कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी महिला कर्मचाऱ्यांना पुरविण्यात आलेल्या साडया खरेदीमध्ये ठेकेदाराने केलेला गैरव्यवहार

**(४२) ४३६४७ (२८-०८-२०१३). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी महिला कर्मचाऱ्यांना पुरविण्यात आलेल्या साडया संबंधित ठेकेदाराने शहरातून खरेदी करून जादा दराने पुरविल्याचे माहे मे, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६) :** (१) होय.

(२) होय, संबंधित ठेकेदारास पुणे महानगरपालिकेमार्फत जादा दराने बिले अदा करण्यात आल्याचे आढळून आले, ही वस्तुस्थिती आहे.

(३) संबंधित ठेकेदारास जादा अदा करण्यात आलेली रक्कम रूपये ९,४६,७२०/-, दिनांक २९.३.१४ रोजी अंतिम बिलामधून वसूल करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी चौकशीअंती तत्कालिन उपआयुक्त, कार्यकारी अभियंता व प्रशासन अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५६(२) अन्वये शास्ती करण्यात आलेली होती.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहराच्या नव्या विकास आराखडयात विद्यापीठाच्या परिसरातून अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी २४ मीटर लांबीचा रस्ता दर्शविण्यात आल्याबाबत**

**(४३) ४३७५४ (२८-०८-२०१३). ॲड. जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या नव्या विकास आराखडयात विद्यापीठाच्या परिसरातून अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी २४ मीटर लांबीचा रस्ता दर्शविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर आराखडयास विद्यापीठाने आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठ परिसरातून अवजड वाहने जाऊ नयेत म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :** (१), (२) व (३) पुणे शहराच्या मूळ हद्दीच्या सुधारीत विकास आराखडयामध्ये पुणे विद्यापीठाच्या सीमा भिंतीच्या कडेने २४ मी. रुंदीचा एचसीएमटीआर (High Capacity Mass Transport Route) दर्शविण्यात आला आहे. विकास योजना शासनाकडे मंजूरीकरिता सादर केलेली आहे. विकास योजनेला शासनस्तरावरुन मंजूरी देताना उचित निर्णय घेण्यात येईल.

---

**मुंबई सेंट्रल येथील बीआयटी चाळीच्या विकासाबाबत**

**(४४) ४४५७८ (२८-०८-२०१३) श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबई सेंट्रल येथील बीआयटी चाळ, सी.एस.नं. २३१ या भुखंडावर भवानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्यामार्फत विकास करण्यात येणार होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकाने प्रस्तावात खोटी व बनावट संमतीपत्रे सादर केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) मुंबई सेंट्रल बेलासिस रोड, भूभाग क्र. २३१ ताडदेव येथील बी.आय.टी. चाळीचा विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत पुनर्विकास करण्याबाबतचा दिनांक २१.०४.२००६ रोजी मुंबई सेंट्रल बी.आय.टी. चाळ सहकारी गृहनिर्माण

संस्था (प्रस्तावित) या गृहनिर्माण संस्थेने नियुक्त केलेले वास्तुविशारद मे.अनिल चावडा यांच्यामार्फत महापालिकेला प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

या प्रस्तावाकरिता संस्थेमार्फत मे. भवानी कन्स्ट्रक्शन यांची विकासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तथापि, सदर प्रस्ताव महापालिकेमार्फत अद्याप मंजूर करण्यात आला नाही.

(२) मेसर्स भवानी कन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या ७६० संमतीपत्रामधील काही संमतीपत्रे बनावट असल्याबाबतची तक्रार श्री.दिलीप दत्तात्रय साळुंखे यांनी नागपाडा पोलीस ठाणे येथे केलेली असल्यामुळे, नागपाडा पोलीस ठाणे यांनी त्यांच्या पत्राद्वारे केलेल्या विनंतीनुसार, एकूण ५२ मूळ संमतीपत्रे तपास कामाकरिता नागपाडा पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आली आहेत.

(३) व (४) सदर बोगस संमतीपत्रांबाबत नागपाडा पोलीस ठाण्यामार्फत गु.र.क्र. ९/२००९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन त्यांचेविरुध्द मा.महानगर दंडाधिकारी, २५ वे न्यायालय, माझगांव येथे क्र. ६५७/पीडब्ल्यू/२०१० अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

---

## अमरावती महानगरपालिकेतील समाज विकास अधिकारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आल्याबाबत

**(४५) ४५८६४ (२०-०१-२०१४). श्री.नागो गाणार :** दिनांक २ ऑगस्ट, २०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ३०७४१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेतील समाज विकास अधिकारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून महानगरपालिकेत अस्थायी स्वरूपात कार्यरत असलेल्या समूह संघटिका यांच्या वेतनातून आर्थिक रक्कम वसूल करण्याचे अमरावती महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आल्याचे मा.मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सदरहू चौकशी पूर्ण होऊन पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) चौकशीअंती अमरावती महानगरपालिकेमध्ये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत सन १९९८-९९ ते २००८-०९ पर्यंत झालेल्या व्यवहारांचे विशेष लेखा परिक्षण करण्याबाबत दिनांक १२ जुलै, २०१२ च्या शासनपत्रान्वये संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई यांना विनंती केलेली होती.

त्यानुसार संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन यांनी या प्रकरणात प्राथमिक चौकशी करून, अहवाल सादर करण्याबाबत मुख्य लेखापरिक्षक, अमरावती महानगरपालिका यांना १६ सप्टेंबर, २०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

त्यानुसार मुख्यलेखापरिक्षक महानगरपालिका, अमरावती यांनी त्यांचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१६ चे पत्रान्वये, चौकशी अहवाल आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांचेकडे सादर केलेला आहे.

या चौकशी अहवालात प्रथमदर्शनी काही अनियमितता आढळून आल्यामुळे आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार १ सहाय्यक प्रकल्प अधिकारी व १ समाज विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

सदरचा प्राथमिक लेखापरिक्षण अहवाल स्थानिक निधी लेखापरिक्षा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला असून, या प्रकरणाचा लवकरात लवकर निपटारा व्हावा या दृष्टिने महापालिकेकडून सतत पाठपुरावा सुरू आहे. असे आयुक्त, अमरावती व महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

**नवी मुंबईतील धोकादायक इमारतीसाठी २.५ आणि गावठाण्यांच्या विकासासाठी ४ एफएसआय देण्याची मागणी होत असल्याबाबत**

**(४६) ४६८३५ (२०-०१-२०१४). ॲड. अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील धोकादायक इमारतीसाठी २.५ आणि गावठाण्यांच्या विकासासाठी ४ एफएसआय देण्याची मागणी नवी मुंबई महापालिकेने मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच यासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १९ व २० सप्टेंबर, २०१३ रोजी वा त्यादरम्यान बैठक घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीस कोणते निर्णय घेण्यात आले आहेत,

(४) उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) यासंदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ खाली शासनाचे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केलेला होता.

(२) होय.

(३) गावठाणांचा समूह विकासाच्या माध्यमातून पुनर्विकास साध्य करण्याच्या अनुषंगाने तसेच सिडको यांच्या स्तरावरही अशा गावठाण व त्यासभोवतालीचे क्षेत्राच्या पुनर्विकासासंबंधी धारेण तयार करण्याच्या दृष्टीने सदर दोन्ही भागातील समुहविकास प्रस्तावांमध्ये सुसूत्रता राहण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव (नवि-१), उपाध्यक्ष तथा व्यवस्थापक, सिडको आणि आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेस्तरावर एकत्रित बैठक घेवून फेरबदल प्रस्तावांची छाननी करून प्रस्ताव शासनास सादर करण्याचे व त्याचप्रमाणे कार्यवाही सिडकोने बांधलेल्या धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी २.५ चटई क्षेत्र अनुज्ञेय करणेच्या प्रस्तावाबाबतही करणेचे ठरलेले होते.

(४) गावठाण व सभोवतालच्या क्षेत्राचा समूह विकासाच्या माध्यमातून विकास करणेसाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दिनांक ४ मार्च, २०१४ रोजीच्या सूचनेन्वये फेरबदल प्रस्तावित करणेत आलेले आहे.

सिडकोने बांधलेल्या धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी २.५ चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे संदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून शासनाने नवी मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील मंजूर फेरबदलाची अधिसूचना दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी निर्गमित केलेली आहे.

----------------

**औरंगाबाद महानगरपालिका परिसरातील गुंठेवारी वसाहतीमध्ये बहुमजली इमारतींचे झाल्याबाबत**

**(४७) ४९०५६ (०२-०८-२०१४). श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ३७१८० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका परिसरातील गुंठेवारी वसाहतीमध्ये बहुमजली इमारतीचे बांधकाम झाले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुंठेवारी मधील घरे नियमित करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) होय.

(२) (३) व (४) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमितीकरण करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधील तरतूदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण असल्याने औरंगाबाद महापालिकेकडून अधिनियमातील तरतुदी नुसार उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मनमाड व देवळाली कॅम्प (जि. नाशिक) येथे तालुका क्रीडा संकुलांना मंजुरी देण्याबाबत**

**(४८) ४९४७७ (२३-०६-२०१४). श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड व देवळाली कॅम्प (जि. नाशिक) येथे खास बाब म्हणून तालुका क्रीडा संकुलांना मंजुरी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०७-२०१४) :** (१) होय.

(२) मनमाड तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम नांदगाव येथील गट क्र. २७/७५५ व मधील १.०० हेक्टर जागेवर सुरु असून सदर काम अंतिम टप्प्यात आहे.

नाशिक जिल्ह्यातील देवळाली कॅम्प या तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम नाशिक जिल्ह्यातील सय्यद पिंप्री येथे गट नं. १०७७ व १०२७ येथे एकूण ३.६३ हेक्टर जागेवर सुरु असून सदर काम अंतिम टप्प्यात सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विभागीय क्रीडा संकुले असणाऱ्या शहरांमध्ये जिल्हा क्रीडा संकुलांना मान्यता देणेबाबत**

**(४९) ४९४८७ (२३-०६-२०१४). श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय क्रीडा संकुले असणाऱ्या शहरांमध्ये जिल्हा क्रीडा संकुलांना मान्यता देणेबाबत शासनाने माहे नोव्हेंबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान धोरणात्मक निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथील जिल्हा क्रीडा संकुलाचा प्रस्ताव माहे मार्च, २०१४ पर्यंत शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (२३-०७-२०१४) :** (१) हे अंशत: खरे आहे राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीत विभागाच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुल उभारण्यास तत्वत: मान्य करण्यात आले व त्यानुसार शासनास प्रस्ताव सादर करावा असे ठरले.

(२), (३) व (४) त्या अनुषंगाने संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे. विभागाच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुले उभारण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**विदर्भातील सिकलसेलग्रस्तांसाठी डागा रुग्णालयात सिकलसेल गर्भजल परिक्षण प्रयोगशाळा उभारण्याबाबत**

**(५०) ५१३३४ (२३-०७-२०१४). श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील सिकलसेलग्रस्तांसाठी गर्भजल परीक्षणाची सुविधा असून देखील मेडीकल आणि मेयो येथील सिकलसेलग्रस्तांना मुंबईमध्ये पाठविण्यात येत असल्याची बाब माहे मार्च, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डागा रुग्णालयात सिकलसेल गर्भजल परिक्षण प्रयोगशाळा उभारण्याबाबतच्या मागणीचा प्रस्ताव मा.आरोग्य मंत्री यांना सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०६-२०१५) :** (१) होय.
(२) हे अंशतः खरे आहे. डागा रुग्णालयात सिकलसेल गर्भजल परिक्षण प्रयोगशाळा उभारण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त (कुटूंब कल्याण) व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना डागा स्मृती शासकीय स्त्री व बाल रुग्णालय, नागपूर यांच्याकडून सादर झाला आहे.
(३) नागपूर येथे सिकलसेल गर्भजल परिक्षण केंद्र उभारण्यासाठीच्या प्रस्तावाला सन २०१४-१५ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरचे गर्भजल परिक्षण केंद्र डागा स्मृती शासकीय स्त्री व बाल रुग्णालय, नागपूर येथे स्थापन करण्याबाबत निश्चित करण्यात आले असून सदर गर्भजल परिक्षण केंद्रासाठी लागणारी आवश्यक यंत्रसामुग्री व साहित्याची खरेदी प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.